REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 10 | JULY - 2026

# गोंदिया जिल्ह्यातील पर्यटनाधारित सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाचा व आर्थिक कामगिरीचा अध्ययन

कु. स्नेहल सुरेश ब्राम्हणकर
संशोधनकर्ती

डॉ. राजेश चांडक
मार्गदर्शक, प्राचार्य,
एन. चंद्रा महिला महाविद्यालय, साकोली, जि. भंडार

**सारांश**



पर्यटन उद्योग हा निवास, भोजन, वाहतूक, मार्गदर्शन, हस्तकला, स्थानिक उत्पादनांची विक्री, सांस्कृतिक सेवा आणि मनोरंजन अशा विविध व्यवसायांना मागणी पुरविणारा बहुआयामी सेवाउद्योग आहे. प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश गोंदिया जिल्ह्यातील पर्यटनाधारित सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचा विकास, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक, भौगोलिक वितरण आणि आर्थिक कामगिरी यांचे दुय्यम आकडेवारीच्या आधारे परीक्षण करणे हा आहे. गोंदिया जिल्ह्यात नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य, कचारगड गुहा, हाजरा धबधबा, प्रतापगड, पदमपूर, तिबेटी वसाहत आणि विविध धार्मिक स्थळे असल्यामुळे निसर्गपर्यटन, वन्यजीव पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, धार्मिक पर्यटन आणि ग्रामीण पर्यटनाच्या विकासाला अनुकूल आधार प्राप्त झाला आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ५,२३४ चौरस किलोमीटर असून लोकसंख्या १३.२२ लाखांपेक्षा अधिक आहे. संशोधनासाठी गोंदिया जिल्ह्याची २०२३, २०२४ व २०२५ मधील जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचने, महाराष्ट्र पर्यटन विभाग, भारत सरकारचे पर्यटन मंत्रालय, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाचे आर्थिक सर्वेक्षण यांचा उपयोग करण्यात आला. विश्लेषणातून दिसून आले की जिल्ह्यात नोंदणीकृत सूक्ष्मलघु व मध्यम उद्योगांची संख्या २०२२-२३ मधील ३७,५४३ वरून २०२४-२५ मध्ये ५८,७१६ झाली. त्याच कालावधीत रोजगार १,११,००३ वरून १,९९,९६६ झाला आणि गुंतवणूक ६०२.९६ कोटी रुपयांवरून ९९२.२४ कोटी रुपयांपर्यंत वाढली. सन २०२४-२५ मध्ये जिल्ह्यात १,२५९ हॉटेल व उपाहारगृहे असून त्यांत२,८३४ व्यक्तींना रोजगार मिळत होता. पर्यटन-संलग्न व्यापार, हॉटेल व उपाहारगृह क्षेत्राचे चालू किमतींवरील स्थूल मूल्यवर्धन २०१९-२० मधील १,६६० कोटी रुपयांवरून २०२३-२४ मध्ये २,४४६ कोटी रुपयांपर्यंत वाढले. निष्कर्षतः पर्यटनाधारित उद्योगांनी जिल्ह्याच्या रोजगार, स्वयंरोजगार आणि सेवा क्षेत्राला सकारात्मक चालना दिली असली, तरी पायाभूत सुविधा, कौशल्य, विपणन, वित्तपुरवठा, डिजिटल दृश्यमानता आणि पर्यटनस्थळांभोवतीउद्योगसमूह निर्माण करण्याची आवश्यकता कायम आहे.

**मुख्य शब्द:** *पर्यटनाधारित उद्योग, सूक्ष्म उद्योग, लघु उद्योग, मध्यम उद्योग, गोंदिया जिल्हा, रोजगारनिर्मिती, आर्थिक कामगिरी, निसर्गपर्यटन.*

## १. प्रस्तावना

पर्यटन हा केवळ प्रवास किंवा विरंगुळ्याचा उपक्रम नसूनअनेक परस्परावलंबी व्यावसायिक सेवांची मागणी निर्माण करणारी आर्थिक प्रक्रिया आहे. पर्यटक एखाद्या प्रदेशात आल्यानंतर निवास, भोजन, स्थानिक वाहतूक, प्रवास मार्गदर्शन, स्मृतिचिन्हे हस्तकला,

कृषी उत्पादने, सांस्कृतिक कार्यक्रम, छायाचित्रण, मनोरंजन आणि दैनंदिनगरजांच्या वस्तूंवर खर्च करतात. या खर्चाचा प्रत्यक्ष लाभ हॉटेल, उपाहारगृह, निवासगृह, वाहनचालक, दुकानदार, मार्गदर्शक आणि पर्यटन आयोजकांना मिळतो. अप्रत्यक्ष लाभ शेतकरी, किरकोळ पुरवठादार, हस्तकलाकार, बांधकाम व्यावसायिक, खाद्यप्रक्रिया उद्योग आणि स्थानिक सेवा पुरवठादारांपर्यंत पोहोचतो. म्हणून पर्यटन खर्चाचा स्थानिक अर्थव्यवस्थेवर गुणक परिणाम निर्माण होतो.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेत उत्पादन, निर्यात, ग्रामीण औद्योगिकीकरण आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयानुसार या क्षेत्राचा देशाच्या सकल उत्पादनात सुमारे३० टक्के आणि निर्यातीत ४५ टक्क्यांपेक्षा अधिक वाटा असून तुलनेने कमी भांडवलात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करण्याची क्षमता या क्षेत्रात आहे. पर्यटन उद्योगात लहान, कुटुंबाधारित आणि स्थानिक उद्योगांचे प्रमाण अधिक असते. अशा उद्योगांच्या माध्यमातून पर्यटनातून मिळणारे उत्पन्न स्थानिक अर्थव्यवस्थेत टिकून राहण्याची शक्यता वाढते.

गोंदिया जिल्हा महाराष्ट्राच्या ईशान्य भागात मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या सीमेजवळ स्थित आहे. जंगल, तलाव, धरणे, जैवविविधता, भातशेती, आदिवासी संस्कृती आणि धार्मिक स्थळे ही जिल्ह्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. जिल्ह्यातील नवेगाव राष्ट्रीय उद्यानाचे क्षेत्रफळ सुमारे १३३.७८ चौरस किलोमीटर असून येथे विविध पक्षी, सस्तन प्राणी आणि सरपटणाऱ्या प्राण्यांच्या प्रजाती आढळतात. नागझिरा वन्यजीव अभयारण्य, सालेकसा तालुक्यातील हाजरा धबधबा आणि कचारगडच्या प्राचीन नैसर्गिक गुहा हेही प्रमुख आकर्षण आहेत.

गोंदिया जिल्ह्यात मोठ्या उद्योगांची मर्यादित उपस्थिती आणि वनक्षेत्राचे मोठे प्रमाण लक्षात घेता पर्यावरणपूरक पर्यटनाधारित उद्योग हे स्थानिक आर्थिक विकासाचे योग्य साधन ठरू शकतात. स्थानिक युवकांसाठी वनमार्गदर्शक सेवा, घरगुती निवास, जैविक खाद्यपदार्थ, स्थानिक पाककला, हस्तकला विक्री, प्रवासी वाहतूक, सायकल पर्यटन, छायाचित्रण, पर्यटन माहिती सेवा आणि डिजिटल आरक्षण यांसारख्या उद्योगांमध्ये संधी उपलब्ध होऊ शकतात.

महाराष्ट्रातील देशांतर्गत पर्यटक भेटींची संख्या२०२१ मधील ४३५.६९ लाखांवरून २०२२ मध्ये १,११२.९८ लाख आणि २०२३ मध्ये १,६१३.६० लाखांपर्यंत वाढली. परदेशी पर्यटक भेटीदेखील२०२१ मधील १.८६ लाखांवरून २०२३ मध्ये ३३.८८ लाख झाल्या. या वाढत्या राज्यस्तरीय पर्यटन मागणीचा नियोजनबद्ध लाभ गोंदियासारख्या निसर्गसंपन्न जिल्ह्याला मिळू शकतो.

## २. संशोधनाची उद्दिष्टे

१) गोंदिया जिल्ह्यातील पर्यटनाधारित सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाची सद्यस्थिती अभ्यासणे.
२) जिल्ह्यातील नोंदणीकृत उद्योगांची संख्या, रोजगार आणि गुंतवणुकीतील बदलांचे विश्लेषण करणे.
३) हॉटेल, उपाहारगृह, निवास, व्यापार आणि पर्यटन-संलग्न सेवांची आर्थिक कामगिरी मोजणे.
४) पर्यटनाधारित आस्थापनांचे तालुकानिहाय वितरण आणि रोजगारक्षमता तपासणे.
५) पर्यटन-संलग्न व्यापार, हॉटेल व वाहतूक क्षेत्राच्या स्थूल मूल्यवर्धनातील बदलांचा अभ्यास करणे.
६) पर्यटनाधारित उद्योगांच्या विकासातील समस्या ओळखून धोरणात्मक उपाय सुचविणे.

## ३. संशोधनाची गृहीतके

- **शून्य गृहीतक १:** सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत गोंदिया जिल्ह्यातील नोंदणीकृत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची संख्या, रोजगार आणि गुंतवणूक यांत सकारात्मक वाढ झालेली नाही.
- **पर्यायी गृहीतक १:** या कालावधीत उद्योगांची संख्या, रोजगार आणि गुंतवणूक यांत सकारात्मक वाढ झाली आहे.
- **शून्य गृहीतक २:** तालुकानिहाय हॉटेल व उपाहारगृहांची संख्या आणि त्यांच्यातील रोजगार यांच्यात सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण संबंध नाही.
- **पर्यायी गृहीतक २:** हॉटेल व उपाहारगृहांची संख्या आणि रोजगार यांच्यात सकारात्मक व महत्त्वपूर्ण संबंध आहे.
- **शून्य गृहीतक ३:** पर्यटन-संलग्न व्यापार, हॉटेल व उपाहारगृह क्षेत्राचे स्थिर किमतींवरील उत्पादन २०२३-२४ मध्ये महामारीपूर्व २०१९-२० पातळीपेक्षा अधिक झालेले नाही.
- **पर्यायी गृहीतक ३:** या क्षेत्राचे स्थिर किमतींवरील उत्पादन महामारीपूर्व पातळीपेक्षा अधिक झाले आहे.

## ४. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व तुलनात्मक स्वरूपाचे असून ते दुय्यम आकडेवारीवर आधारित आहे. गोंदिया जिल्ह्यातील पर्यटनाधारित उद्योगांची स्वतंत्र व सातत्यपूर्ण आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे हॉटेल, उपाहारगृहे, निवासव्यवस्था, व्यापार, वाहतूक आणि नोंदणीकृत उद्योग यांचा पर्यटन-संलग्न प्रतिनिधी निर्देशांक म्हणून वापर करण्यात आला. अध्ययनासाठी गोंदिया जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२३, २०२४ व २०२५, जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र पर्यटन विभाग, भारत सरकारचे पर्यटन मंत्रालय, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण, जिल्ह्याचा औद्योगिक आराखडा आणि संबंधित संशोधन साहित्य वापरण्यात आले. उद्योगसंख्या, रोजगार व गुंतवणुकीसाठी २०२२-२३ ते २०२४-२५, तर जिल्हा उत्पन्नासाठी २०१९-२० ते २०२३-२४ हा कालावधी स्वीकारण्यात आला. विश्लेषणासाठी टक्केवारीतील बदल, वार्षिक संयुक्त वृद्धिदर, प्रति उद्योग रोजगार व गुंतवणूक, क्षेत्रीय वाटा, पिअर्सन सहसंबंध आणि तुलनात्मक निर्देशांक वापरण्यात आले. आवश्यक पर्यटन आकडेवारी अपूर्ण असल्यामुळे निष्कर्ष पर्यटन संलग्न आर्थिक हालचालींचे प्रतिनिधी सूचक मानण्यात आले आहेत.

## ५. सैद्धान्तिक चौकट

### ५.१ पर्यटन गुणकाचा सिद्धान्त

पर्यटकाने हॉटेलमध्ये केलेला खर्च केवळ हॉटेलच्या उत्पन्नापुरता मर्यादित राहत नाही. हॉटेल स्थानिक शेतकऱ्यांकडून भाजीपाला, व्यापाऱ्यांकडून किराणा, कामगारांकडून सेवा आणि वाहनधारकांकडून वाहतूक घेत असल्यामुळे हा पैसा अर्थव्यवस्थेत पुन्हा वितरित होतो. पर्यटनाच्या प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष आणि प्रेरित परिणामांची ही साखळी पर्यटन गुणक म्हणून ओळखली जाते.

### ५.२ स्थानिक उद्योगसमूहाचा दृष्टिकोन

पोर्टर यांच्या उद्योगसमूह संकल्पनेनुसार परस्परपूरक उद्योगांचे एका प्रदेशातील जाळे उत्पादकता, नवकल्पना आणि स्पर्धात्मकता वाढवते. गोंदियात वनपर्यटनस्थळे, निवासगृहे, खाद्यव्यवसाय, वाहतूकदार, मार्गदर्शक, हस्तकलाकार आणि डिजिटल प्रवास सेवा यांना एकत्रित केल्यास पर्यटन उद्योगसमूह निर्माण होऊ शकतो.

### ५.३ लघु पर्यटन उद्योगांचा सिद्धान्त

लहान पर्यटन व्यवसाय हे स्थळाच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक असले, तरी त्यांना वित्त, तंत्रज्ञान, विपणन आणि व्यवस्थापनातील मर्यादा जाणवतात. Thomas, Shaw आणि Page यांनी लघु पर्यटन व्यवसायांची स्थानिक अर्थव्यवस्था, धोरण आणि पर्यटनस्थळाच्या स्पर्धात्मकतेशी असलेली गुंतागुंतीची जोड अधोरेखित केली आहे.

पर्यटनातील अनेक उद्योग कुटुंबाधारित असतात. अशा उद्योगांत स्थानिक ज्ञान, वैयक्तिक सेवा आणि कमी संचालन खर्च हे लाभ असतात; मात्र उत्तराधिकार, व्यावसायिक व्यवस्थापन आणि विस्तारक्षमतेच्या समस्या निर्माण होतात. पर्यटन उद्योजक आर्थिक लाभाबरोबरच विशिष्ट जीवनशैली, स्थानिक ओळख आणि समुदायाशी नाते टिकविण्याच्या प्रेरणेनेही व्यवसाय करतात.

### ५.४ समुदायाधारित आणि शाश्वत पर्यटन

निसर्गपर्यटनातून मिळणारे उत्पन्न स्थानिक समुदायापर्यंत पोहोचल्यास रोजगार, आत्मसन्मान, प्रशिक्षण, महिला सहभाग आणि संसाधन संरक्षणाला चालना मिळते. मात्र पर्यटन नियोजनात समुदायाचा सहभाग नसल्यास आर्थिक लाभ बाहेरील व्यवसायांकडे जाऊ शकतो. Scheyvens यांनी पर्यावरणीय पर्यटनाच्या यशासाठी आर्थिक, सामाजिक, मानसिक आणि राजकीय सक्षमीकरण आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. गरीब आणि वंचित समुदायांना थेट रोजगार, पुरवठा करार आणि सूक्ष्म उद्योजकतेच्या माध्यमातून पर्यटन मूल्यसाखळीत जोडणे हे समावेशक पर्यटनाचे केंद्रस्थान आहे.

### ५.५ स्थानिक ओळख आणि उद्योग कामगिरी

पर्यटन उद्योजकांची स्थानिक ओळख, स्वकार्यक्षमता आणि समुदायाविषयीची बांधिलकी उद्योगाच्या कामगिरीवर सकारात्मक परिणाम करू शकते. ३०१ पर्यटन उद्योजकांच्या अध्ययनात स्थानिक ओळखीचा उद्योजकीय आत्मविश्वास आणि उद्योग कामगिरीवर सकारात्मक अप्रत्यक्ष परिणाम आढळला होता. गोंदियातील स्थानिक युवक, आदिवासी समुदाय आणि महिला बचतगटांकडे असलेले जंगल, खाद्यसंस्कृती आणि स्थानिक परंपरांचे ज्ञान हे पर्यटन उत्पादनात रूपांतरित करता येऊ शकते.

## ६.आकडेवारीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

### ६.१ राज्यातील पर्यटन मागणीचे वातावरण

**तक्ता १ : महाराष्ट्रातील पर्यटक भेटी**

| वर्ष | देशांतर्गत पर्यटक भेटी (लाख) | परदेशी पर्यटक भेटी (लाख) |
|---|---|---|
| २०२१ | ४३५.६९ | १.८६ |
| २०२२ | १,११२.९८ | १५.१२ |
| २०२३ | १,६१३.६० | ३३.८८ |

**स्रोत:** भारत सरकार, पर्यटन मंत्रालय.

महाराष्ट्रातील देशांतर्गत पर्यटक भेटींमध्ये २०२१ ते २०२३ या कालावधीत सुमारे २७० टक्के वाढ झाली. ही वाढ महामारीनंतर पर्यटन मागणीत झालेल्या पुनरुज्जीवनाचे निदर्शक आहे. गोंदिया जिल्ह्याने स्वतःची निसर्गपर्यटन प्रतिमा, डिजिटल माहिती, प्रवास मार्ग आणि एकत्रित पर्यटन संच विकसित केल्यास या वाढत्या बाजारपेठेतील काही भाग आकर्षित करता येईल.

### ६.२ नोंदणीकृत उद्योगांचा विकास

**तक्ता २ : गोंदिया जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची प्रगती**

| वर्ष | नोंदणीकृत उद्योगसंख्या | रोजगारसंख्या | गुंतवणूक (लाख रुपये) |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ३७,५४३ | १,११,००३ | ६०,२९६ |
| २०२३-२४ | ४६,९६३ | १,३८,६७९ | ७५,३७८ |
| २०२४-२५ | ५८,७१६ | १,९९,९६६ | ९९,२२४ |
| दोन वर्षांतील एकूण वाढ | ५६.४०% | ८०.१४% | ६४.५६% |
| वार्षिक संयुक्त वृद्धिदर | २५.०६% | ३४.२२% | २८.२८% |

**स्रोत:** गोंदिया जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०२३, २०२४ व २०२५; संशोधकाची गणना.

उद्योगसंख्या दोन वर्षांत २१,१७३ ने वाढली. रोजगारसंख्येत ८८,९६३ आणि गुंतवणुकीत ३८,९२८ लाख रुपयांची वाढ झाली. रोजगाराचा वृद्धिदर उद्योगसंख्येच्या वृद्धिदरापेक्षा अधिक असल्यामुळे २०२४-२५ मध्ये नोंदणीकृत उद्योगांची सरासरी रोजगारक्षमता सुधारल्याचे दिसते. प्रति उद्योग सरासरी रोजगार २०२२-२३ मधील सुमारे २.९६ व्यक्तींवरून २०२४-२५ मध्ये ३.४१ व्यक्ती झाला. सन २०२४-२५ मध्ये प्रति उद्योग सरासरी नोंदविलेली गुंतवणूक सुमारे १.६९ लाख रुपये होती. या कमी सरासरी गुंतवणुकीवरून जिल्ह्यातील उद्योगरचनेत सूक्ष्म उद्योगांचे प्राबल्य असल्याचे सूचित होते.

### ६.३ तालुकानिहाय उद्योग, रोजगार व गुंतवणूक

**तक्ता ३ : तालुकानिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची स्थिती, २०२४-२५**

| तालुका | उद्योगसंख्या | रोजगार | गुंतवणूक (लाख रुपये) |
|---|---|---|---|
| तिरोडा | ९,६९१ | ३२,३९४ | १६,०८२ |
| गोरेगाव | ५,१३२ | १७,४७७ | ८,६७१ |
| गोंदिया | २७,०४५ | ९२,१०४ | ४५,६९८ |
| आमगाव | ५,७६६ | १९,६३७ | ९,७४३ |
| सालेकसा | २,४६६ | ८,३९९ | ४,१६७ |
| सडक-अर्जुनी | २,४६८ | ९,०१८ | ४,४७५ |
| अर्जुनी मोरगाव | ३,६७० | १२,४९८ | ६,२०१ |
| देवरी | २,४७८ | ८,४३९ | ४,१८७ |
| **एकूण** | **५८,७१६** | **१,९९,९६६** | **९९,२२४** |

**स्रोत:** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२५.

गोंदिया तालुक्यात जिल्ह्याच्या उद्योगसंख्येपैकी ४६.०६ टक्के, रोजगारापैकी ४६.०६ टक्के आणि गुंतवणुकीपैकी सुमारे४६.०५ टक्के भाग केंद्रित आहे. जिल्हा मुख्यालय, रेल्वे संपर्क, बाजारपेठ, प्रशासकीय सुविधा आणि आर्थिक सेवांची उपलब्धता यांमुळे येथे उद्योगांचे केंद्रीकरण झाले आहे.

नवेगाव राष्ट्रीय उद्यानाशी जवळीक असलेल्या अर्जुनी मोरगाव, नागझिराशी जोडलेल्या गोरेगाव व सडक-अर्जुनी आणि हाजरा धबधबा व कचारगड असलेल्या सालेकसा भागात पर्यटन क्षमता मोठी असली, तरी उद्योगसंख्या तुलनेने कमी आहे. त्यामुळे नैसर्गिक पर्यटन संसाधने आणि उद्योग विकास यांच्यातील भौगोलिक दरी स्पष्ट होते.

### ६.४ पर्यटनाशी थेट संबंधित आस्थापने

**तक्ता ४ : हॉटेल व उपाहारगृहांची तालुकानिहाय स्थिती, २०२४-२५**

| तालुका | हॉटेल व उपाहारगृहे | रोजगार | प्रति आस्थापना रोजगार |
|---|---|---|---|
| तिरोडा | २४४ | ४५० | १.८४ |
| गोरेगाव | ११५ | ३०० | २.६१ |
| गोंदिया | ५५० | ९६९ | १.७६ |
| आमगाव | ७० | १८० | २.५७ |
| सालेकसा | ४० | १२० | ३.०० |
| सडक-अर्जुनी | ६० | २५० | ४.१७ |
| अर्जुनी मोरगाव | ११० | ३५० | ३.१८ |
| देवरी | ७० | २१५ | ३.०७ |
| **एकूण** | **१,२५९** | **२,८३४** | **२.२५** |

**स्रोत:** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२५; संशोधकाची गणना.

जिल्ह्यातील १,२५९ हॉटेल व उपाहारगृहांमध्ये २,८३४ व्यक्तींना रोजगार मिळत असून प्रति आस्थापना सरासरी रोजगार २.२५ आहे. त्याशिवाय निवासगृहे, पांथस्थाश्रम आणि इतर संबंधित प्रकारातील११० आस्थापनांमध्ये ५२१ व्यक्ती कार्यरत होत्या. चित्रपटगृहांचा समावेश केल्यास पर्यटन, निवास, भोजन व मनोरंजनाशी प्रत्यक्षपणे संबंधित आस्थापनांची संख्या१,३७५ आणि त्यातील रोजगार सुमारे ३,४०० होतो.

गोंदिया तालुक्यात जिल्ह्यातील हॉटेल व उपाहारगृहांपैकी४३.६९ टक्के केंद्रित आहेत. मात्र सडक-अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, सालेकसा आणि देवरी येथील प्रति आस्थापना रोजगार गोंदिया तालुक्यापेक्षा अधिक आहे. पर्यटनस्थळांजवळीलग्रामीण आस्थापनांना निवास, भोजन, मार्गदर्शन आणि स्थानिक वाहतूक यांची जोड दिल्यास रोजगारक्षमता आणखी वाढू शकते.

### ६.५ पर्यटन-संलग्न सेवा क्षेत्राची आर्थिक कामगिरी

**तक्ता ५ : पर्यटन-संलग्न जिल्हा स्थूल मूल्यवर्धन—चालू किमतींवर**

| वर्ष | व्यापार, दुरुस्ती, हॉटेल व उपाहारगृहे | रेल्वे | इतर वाहतूक | साठवण | विस्तृत पर्यटन-संलग्न निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | १,६६० | ८५ | ४८१ | २८ | २,२५४ |
| २०२०-२१ | १,२५८ | ८५ | ३६१ | २८ | १,७३२ |
| २०२१-२२ | १,६४७ | ९४ | ५३७ | ३२ | २,३१० |
| २०२२-२३ | २,१९२ | ११२ | ६२० | ४० | २,९६४ |
| २०२३-२४ | २,४४६ | १२४ | ६७८ | ४६ | ३,२९४ |

**टीप:** रक्कम कोटी रुपयांत. विस्तृत निर्देशांकात पर्यटनाव्यतिरिक्त व्यापार व वाहतूक व्यवहारांचाही समावेश आहे.

**स्रोत:** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२५; संशोधकाची बेरीज व गणना.

पर्यटन-संलग्न विस्तृत निर्देशांक २०१९-२० मधील २,२५४ कोटी रुपयांवरून महामारीमुळे २०२०-२१ मध्ये सुमारे १,७३२ कोटी रुपयांपर्यंत घसरला. त्यानंतर तो २०२३-२४ मध्ये ३,२९४ कोटी रुपयांपर्यंत वाढला. संपूर्ण कालावधीतील चालू किमतींवरील वाढ ४६.१४ टक्के आणि वार्षिक संयुक्त वृद्धिदर सुमारे ९.९५ टक्के होता.

व्यापार, दुरुस्ती, हॉटेल व उपाहारगृह क्षेत्राचे चालू किमतींवरील मूल्यवर्धन १,६६० कोटी रुपयांवरून २,४४६ कोटी रुपये झाले. ही वाढ ४७.३५ टक्के आहे. मात्र चलनवाढीचा परिणाम वगळण्यासाठी स्थिर किमतींवरील आकडे तपासणे आवश्यक आहे.

**तक्ता ६ : व्यापार, हॉटेल व उपाहारगृह क्षेत्राची स्थिर किमतींवरील कामगिरी**

| वर्ष | स्थूल मूल्यवर्धन (कोटी रुपये) | २०१९-२० = १०० निर्देशांक |
|---|---|---|
| २०१९-२० | १,१५७ | १००.०० |
| २०२०-२१ | ८२९ | ७१.६५ |
| २०२१-२२ | १,००९ | ८७.२१ |
| २०२२-२३ | १,२१९ | १०५.३६ |
| २०२३-२४ | १,२८९ | १११.४१ |

**स्रोत:** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२५; संशोधकाची गणना.

स्थिर किमतींवर २०२३-२४ मधील उत्पादन २०१९-२० च्या तुलनेत ११.४१ टक्क्यांनी अधिक होते. वास्तविक वार्षिक संयुक्त वृद्धिदर मात्र केवळ २.७४ टक्के होता. त्यामुळे चालू किमतींवरील सुमारे १० टक्के वृद्धिदराचा मोठा भाग किंमतवाढीशी संबंधित असल्याचे दिसते.

२०२३-२४ मध्ये जिल्ह्याच्या सेवा क्षेत्राचे स्थूल मूल्यवर्धन १६,१७८ कोटी रुपये आणि एकूण स्थूल मूल्यवर्धन २६,२६३ कोटी रुपये होते. सेवा क्षेत्राचा वाटा सुमारे ६१.६० टक्के होता. व्यापार, हॉटेल व उपाहारगृह क्षेत्राचा सेवा क्षेत्रातील वाटा १५.१२ टक्के आणि एकूण स्थूल मूल्यवर्धनातील वाटा ९.३१ टक्के होता. जिल्ह्याच्या आर्थिक रचनेत सेवा व्यवसायांचे वाढते महत्त्व या प्रमाणातून स्पष्ट होते.

## ७. अध्ययनाचे प्रमुख परिणाम

अध्ययनातून असे स्पष्ट झाले की गोंदिया जिल्ह्यातील नोंदणीकृत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची संख्या २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत ५६.४० टक्क्यांनी वाढली असून उद्योगांमधील रोजगारवाढ ८०.१४ टक्के नोंदविण्यात आली, जी उद्योगसंख्या आणि गुंतवणुकीच्या वाढीपेक्षा अधिक आहे. उद्योगांतील एकूण गुंतवणूक ६०२.९६ कोटी रुपयांवरून ९९२.२४ कोटी रुपयांपर्यंत वाढली असून उद्योग, रोजगार आणि गुंतवणुकीपैकी सुमारे ४६ टक्के भाग एकट्या गोंदिया तालुक्यात केंद्रित असल्याचे दिसून आले. पर्यटनाची विपुल नैसर्गिक संसाधने असलेल्या सालेकसा, अर्जुनी मोरगाव, सडक-अर्जुनी आणि गोरेगाव तालुक्यांमध्ये उद्योगविकासाची मोठी अप्रयुक्त क्षमता आहे. जिल्ह्यात १,२५९ हॉटेल व उपाहारगृहे असून त्यांमध्ये २,८३४ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला आहे, तर पर्यटन, भोजन, निवास आणि मनोरंजनाशी थेट संबंधित आस्थापनांमध्ये किमान ३,४०० रोजगार नोंदविण्यात आले आहेत. पर्यटन-संलग्न व्यापार, हॉटेल आणि वाहतूक क्षेत्राने महामारीनंतर वेगवान आर्थिक सुधारणा दर्शविली असून व्यापार, हॉटेल व उपाहारगृह क्षेत्राचे वास्तविक उत्पादन २०२३-२४ मध्ये महामारीपूर्व पातळीपेक्षा ११.४१ टक्क्यांनी अधिक होते. तथापि, चालू किमतींवरील वाढ आणि स्थिर किमतींवरील वाढ यांतील मोठ्या अंतरामुळे आर्थिक कामगिरीचे मूल्यांकन करताना चलनवाढीचा विचार करणे आवश्यक आहे. पर्यटन उद्योगांची वाढ मुख्यालय-केंद्रित असून पर्यटनस्थळांभोवती संघटित उद्योगसमूहांची कमतरता दिसून येते. तसेच जिल्हास्तरावर पर्यटकांची संख्या, खर्च, मुक्कामाचा कालावधी आणि उद्योगांचा महसूल यांची सातत्यपूर्ण माहिती उपलब्ध नसणे ही प्रभावी पर्यटन नियोजनातील महत्त्वाची मर्यादा आहे.

## ८. चर्चा

गोंदिया जिल्ह्यातील उद्योगवाढ ही सकारात्मक असली, तरी सर्व नोंदणीकृत उद्योग पर्यटनाधारित आहेत असे मानता येत नाही. तथापि, पर्यटनाशी थेट संबंधित हॉटेल, भोजन, निवास आणि वाहतूक क्षेत्रातील आस्थापने आणि सेवा क्षेत्रातील मूल्यवर्धन यांची वाढ पर्यटनाधारित व्यवसाय विस्तारासाठी अनुकूल आर्थिक वातावरण दर्शविते.

गोंदिया तालुक्यात उद्योगांचे केंद्रीकरण हे मागणी, वाहतूक, बँकिंग, बाजारपेठ आणि प्रशासकीय सेवांच्या उपलब्धतेशी संबंधित आहे. दुसरीकडे, प्रमुख पर्यटनस्थळे ग्रामीण आणि वनक्षेत्रात विखुरलेली आहेत. पर्यटक गोंदिया शहरातून पर्यटनस्थळी जाऊन त्याच दिवशी परतत असल्यास पर्यटनस्थळांच्या आसपासच्या गावांना निवास आणि स्थानिक खरेदीतून मर्यादित लाभ मिळतो. म्हणून मुक्कामाधारित पर्यटन, गावभेट, स्थानिक खाद्य अनुभव, पक्षीनिरीक्षण, जंगलमार्गदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची जोड आवश्यक आहे.

लहान पर्यटन उद्योगांना ग्राहकांची हंगामी मागणी, अस्थिर रोकडप्रवाह, ऑनलाइन आरक्षणातील मर्यादित उपस्थिती आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता जाणवते. लघु पर्यटन उद्योगांवरील संशोधनातही वित्तपुरवठा, व्यावसायिक व्यवस्थापन, नवकल्पना आणि नेटवर्किंग या प्रमुख समस्या असल्याचे आढळते. गोंदियासाठी स्वतंत्र पर्यटन उद्योग मंच स्थापन करून हॉटेल, वाहनधारक, मार्गदर्शक, खाद्यव्यावसायिक, वनविभाग आणि ग्रामसंस्था यांचे जाळे निर्माण करणे उपयुक्त ठरेल.

महिला बचतगटांना भोजनसेवा, स्थानिक भातापासून बनविलेले पदार्थ, बांबू व वनाधारित हस्तकला, स्वच्छतासाहित्य, पर्यटन स्मृतिचिन्हे आणि घरगुती निवासात सहभागी करता येईल. आदिवासी समुदायांचे पारंपरिक ज्ञान व्यावसायिकदृष्ट्या वापरताना समुदायाची संमती, सांस्कृतिक सन्मान आणि उत्पन्नातील न्याय्य वाटा सुनिश्चित केला पाहिजे.

पर्यटन धोरणात मोठ्या प्रकल्पांबरोबर सूक्ष्म उद्योगांच्या मूल्यसाखळीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४ मध्ये शाश्वत पर्यटन, गुंतवणूक, पर्यटन पायाभूत सुविधा आणि रोजगारनिर्मितीवर भर देण्यात आला आहे. गोंदिया जिल्ह्याने या धोरणांतर्गत निसर्गपर्यटन उद्योगसमूह, पर्यटन कौशल्य केंद्र आणि एकात्मिक डिजिटल गंतव्य व्यवस्थापनाचा प्रस्ताव विकसित करावा.

## ९. गृहीतक परीक्षण

२०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत गोंदिया जिल्ह्यातील उद्योगसंख्येत ५६.४० टक्के, रोजगारात ८०.१४ टक्के आणि गुंतवणुकीत ६४.५६ टक्के वाढ झाली असून उद्योगसंख्येचा वार्षिक संयुक्त वृद्धिदर २५.०६ टक्के, रोजगाराचा ३४.२२ टक्के आणि गुंतवणुकीचा २८.२८ टक्के आढळून आला. सर्व निर्देशकांनी सकारात्मक वाढ दर्शविल्यामुळे शून्य गृहीतक १ नाकारण्यात येऊन पर्यायी गृहीतक १ स्वीकारण्यात आले. आठ तालुक्यांतील हॉटेल व उपाहारगृहांची संख्या आणि त्यांतील रोजगार यांच्यातील संबंध तपासण्यासाठी पिअर्सन सहसंबंध गुणांक मोजण्यात आला. प्राप्त सहसंबंध गुणांक ०.९८७ आणि संभाव्यता मूल्य ०.००१ पेक्षा कमी असल्यामुळे दोन्ही चलांमध्ये अत्यंत उच्च, सकारात्मक आणि सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण संबंध असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे शून्य गृहीतक २ नाकारून पर्यायी गृहीतक २ स्वीकारण्यात आले; तथापि, हे विश्लेषण केवळ आठ तालुक्यांच्या प्रशासकीय आकडेवारीवर आधारित असल्यामुळे निष्कर्षाचे सामान्यीकरण सावधपणे करणे आवश्यक आहे. स्थिर किमतींवरील व्यापार, हॉटेल व उपाहारगृह क्षेत्राचे मूल्यवर्धन २०१९-२० मधील १,१५७ कोटी रुपयांवरून २०२३-२४ मध्ये १,२८९ कोटी रुपयांपर्यंत वाढले. या कालावधीत वास्तविक वाढ ११.४१ टक्के आणि वास्तविक वार्षिक संयुक्त वृद्धिदर २.७४ टक्के होता. त्यामुळे २०२३-२४ मधील वास्तविक उत्पादन महामारीपूर्व पातळीपेक्षा अधिक असल्याने शून्य गृहीतक ३ नाकारून पर्यायी गृहीतक ३ स्वीकारण्यात आले. मात्र वास्तविक वृद्धिदर मध्यम असल्यामुळे आर्थिक पुनरुज्जीवन झाले असले, तरी क्षेत्राचा वेगवान विस्तार अद्याप साध्य झालेला नाही.

## १०. निष्कर्ष

गोंदिया जिल्ह्यातील पर्यटनाधारित सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग जिल्ह्याच्या आर्थिक विविधीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. जिल्ह्यातील नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य, कचारगड, हाजरा धबधबा, प्रतापगड आणि सांस्कृतिक-धार्मिक स्थळांमुळे पर्यटनासाठी मजबूत नैसर्गिक आधार उपलब्ध आहे. नोंदणीकृत उद्योग, रोजगार आणि गुंतवणुकीतील वाढ जिल्ह्यात उद्योजकतेसाठी अनुकूल बदल होत असल्याचे दर्शविते. पर्यटन-संलग्न व्यापार, हॉटेल आणि वाहतूक सेवांनी महामारीनंतर आर्थिक पुनरुज्जीवन नोंदविले आहे. तरीही उद्योगविकास प्रामुख्याने गोंदिया शहराभोवती केंद्रित असून पर्यटनस्थळांलगतच्या ग्रामीण व वनक्षेत्रात आवश्यक व्यावसायिक सुविधा अपुऱ्या आहेत. पर्यटकांचा मुक्काम वाढविण्यासाठी स्वच्छ व प्रमाणित घरगुती निवास, स्थानिक भोजनकेंद्रे, प्रशिक्षित मार्गदर्शक, सुरक्षित वाहतूक, डिजिटल आरक्षण, पर्यटक माहिती केंद्रे आणि स्वच्छतागृहे विकसित करणे आवश्यक आहे. जिल्हा प्रशासनाने पर्यटन उद्योगांची स्वतंत्र नोंदणी आणि वार्षिक पर्यटन आर्थिक गणना सुरू करावी. प्रत्येक पर्यटनस्थळी पर्यटक संख्या, मुक्काम, खर्च, रोजगार, स्थानिक खरेदी आणि उद्योग महसूल यांचा माहिती-संच तयार केला पाहिजे. उद्यम नोंदणी, मुद्रा कर्ज, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, कौशल्य प्रशिक्षण आणि डिजिटल विपणन यांची एकखिडकी व्यवस्था पर्यटनस्थळांजवळ उपलब्ध करावी. नवेगाव–नागझिरा–गोंदिया, सालेकसा–कचारगड–हाजरा आणि अर्जुनी मोरगाव–नवेगाव असे पर्यटन उद्योगमार्ग विकसित करता येतील. प्रत्येक मार्गावर भोजन,

निवास, वाहतूक, हस्तकला, कृषी उत्पादने आणि सांस्कृतिक अनुभवांची स्थानिक मूल्यसाखळी निर्माण केल्यास पर्यटन खर्चाचा अधिक हिस्सा जिल्ह्यात टिकून राहील. पर्यावरणीय वहनक्षमता, वन्यजीव संरक्षण आणि स्थानिक समुदायाचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग यांचे पालन केल्यास पर्यटनाधारित उद्योगांचा विकास रोजगारक्षम, समावेशक आणि शाश्वत आर्थिक विकासाचा आधार ठरू शकतो.

## संदर्भसूची


1) *District Statistical Office, Gondia. (2023). District social and economic review 2023: Gondia district. Directorate of Economics and Statistics, Government of Maharashtra.*
2) *District Statistical Office, Gondia. (2024). District social and economic review 2024: Gondia district. Directorate of Economics and Statistics, Government of Maharashtra.*
3) *District Statistical Office, Gondia. (2025). District social and economic review 2025: Gondia district. Directorate of Economics and Statistics, Government of Maharashtra.*
4) *District Administration, Gondia. (2026). Places of interest in Gondia district. Government of Maharashtra.*
5) *Department of Tourism, Government of Maharashtra. (2026). Gondia: Destination information. Government of Maharashtra.*
6) *Directorate of Economics and Statistics, Government of Maharashtra. (2024). Economic survey of Maharashtra 2023–24. Government of Maharashtra.*
7) *Government of India. (2006). Micro, Small and Medium Enterprises Development Act, 2006. Government of India.*
8) *Government of Maharashtra. (2024). Maharashtra tourism policy 2024. Department of Tourism, Government of Maharashtra.*
9) *Ministry of Micro, Small and Medium Enterprises. (2025). Annual report 2024–25. Government of India.*
10) *Ministry of Tourism. (2024). Standard methodology for conducting surveys and studies on tourism. Government of India.*
11) *Ministry of Tourism. (2024, November 25). Promotion of tourism in Maharashtra: Lok Sabha Unstarred Question No. 135. Government of India.*
12) *Ministry of Tourism. (2025). India tourism data compendium 2024. Government of India.*
13) *MSME Development Institute, Nagpur. (2016). Brief industrial profile of Gondia district 2015–16. Ministry of Micro, Small and Medium Enterprises, Government of India.*
14) *Ashley, C., Roe, D., & Goodwin, H. (2001). Pro-poor tourism strategies: Making tourism work for the poor—A review of experience. Overseas Development Institute, International Institute for Environment and Development, and Centre for Responsible Tourism.*
15) *Ateljevic, I., & Doorne, S. (2000). Staying within the fence: Lifestyle entrepreneurship in tourism. Journal of Sustainable Tourism, 8(5), 378–392. doi:10.1080/09669580008667374*
16) *Baggio, R., & Cooper, C. (2010). Knowledge transfer in a tourism destination: The effects of a network structure. The Service Industries Journal, 30(10), 1757–1771. doi:10.1080/02642060903580649*
17) *Getz, D., & Carlsen, J. (2005). Family business in tourism: State of the art. Annals of Tourism Research, 32(1), 237–258. doi:10.1016/j.annals.2004.07.006*
18) *Hallak, R., Brown, G., & Lindsay, N. J. (2012). The place identity–performance relationship among tourism entrepreneurs: A structural equation modelling analysis. Tourism Management, 33(1), 143–154. doi:10.1016/j.tourman.2011.02.013*
19) *Morrison, A., Carlsen, J., & Weber, P. (2010). Small tourism business research change and evolution. International Journal of Tourism Research, 12(6), 739–749. doi:10.1002/jtr.789*
20) *Scheyvens, R. (1999). Ecotourism and the empowerment of local communities. Tourism Management, 20(2), 245–249. doi:10.1016/S0261-5177(98)00069-7*
21) *Thomas, R., Shaw, G., & Page, S. J. (2011). Understanding small firms in tourism: A perspective on research trends and challenges. Tourism Management, 32(5), 963–976. doi:10.1016/j.tourman.2011.02.003*